# ‘आचार्य अत्रेंचे साहित्य प्रेरणादायी’

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

**पुणे :** विविध क्षेत्रात महत्त्वाचे योगदान देणाऱ्या आचार्य अत्रेंचे कार्य आणि साहित्य आजही प्रेरणादायी आहे, असे मत साहित्यिक प्रा. श्याम भुर्के यांनी मांडले. बुकगंगा इंटरनॅशनल बुक सर्व्हिसच्या वतीने अत्रे यांची जयंती साजरी करण्यात आली. त्या वेळी भुर्के बोलत होते. संचालिका सुप्रिया लिमये या वेळी उपस्थित होत्या.

अष्टपैलू हे विशेषण कमी पडेल असे आचार्य अत्रे यांचे व्यक्तिमत्व होते. शिक्षणापासून ते राजकारणपर्यंतच्या प्रत्येक क्षेत्रात त्यांनी उत्तुंग शिखर गाठले. वृत्तपत्र क्षेत्रातही त्यांनी स्वतःचा ठसा उमटवला होता. चित्रपट क्षेत्रामध्ये त्यांचे योगदान मोठे आहे. अत्रे यांचे हजरजबाबीपणाचे किस्से आजही सुप्रसिद्ध आहेत.

पुणे नगरपालिकेचे सदस्य असताना पुण्यातील रस्त्यांच्या डांबरीकरण, बससेवा, प्राथमिक शिक्षकांसाठी गांधी ट्रेनिंग सुरू केली. संभाजी उद्यान, जिजामाता उद्यान उभारले. कॉलेज काढले. रे मार्केटला महात्मा फुले मंडई नाव दिले. भांबुर्ड्याला शिवाजीनगर नाव दिले,’ असे भुर्के यांनी सांगितले.